# नवमहाराष्ट्र युवा अभियान

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट (मंत्रालयासमोर), मुंबई-४०००२१.

दूरध्वनी : (०२२) २२०२८५९८, २२८५२०८१, फॅक्स : २२८५२०८२


## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार : २०२०-२१

### - नियमावली -

१. **पुरस्काराचे नाव :** यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार.

२. **उद्दिष्ट :** महाराष्ट्रातील उत्कृष्ट युवा खेळाडू म्हणून त्यांच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे, हे या क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे.

३. **पुरस्काराचे स्वरुप :** रोख रु. २१,०००/-, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र

४. **पुरस्कारांची संख्या :** महाराष्ट्र राज्यातील क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एका युवक व एका युवती खेळाडूस या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

५. **पुरस्काराचा कालावधी :** पुरस्काराचे वर्ष, दिनांक १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१९ या मागील पाच वर्षांची कामगिरी विचारात घेण्यात येईल.

६. **पुरस्काराची पात्रता**

अ) खेळाडूने सतत पाच वर्षे राज्यात मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

ब) पुरस्कारासाठी व्यक्तीचा वयोगट १८ ते ३५ (३१ डिसेंबर २०२० अखेरीस) दरम्यान असला पाहिजे.

क) एकदा एका खेळामध्ये किंवा प्रवर्गामध्ये पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती पुन्हा त्याच खेळात किंवा प्रवर्गात क्रीडा युवा पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.

७. **गुणांकन पध्दती**

महाराष्ट्रातील उत्कृष्ट क्रीडापटू पुरस्कारासाठी निवड करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

अ) गेल्या पाच वर्षात राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते खेळाडू राज्य युवा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहील.

ब) उत्कृष्ट क्रीडापटूकरीता पात्रता निकष खालीलप्रमाणे -

१) सांघिक अथवा वैयक्तिक मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारात खुल्या गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा, नॅशनल गेम, फेडरेशन चषक स्पर्धा, आंतर विद्यापीठ स्पर्धा, अथवा राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम क्रमांकापर्यंत यश मिळविणारे तीन उत्कृष्ट क्रीडापटू पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

**खेळाडूंसाठी गुणांकन प्राधान्यक्रम (वैयक्तिक व सांघिक खेळ)**

| | |
|---|---|
| १ | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा - उच्चांक |
| २ | राज्य क्रीडा स्पर्धा - उच्चांक |
| ३ | जिल्हा क्रीडा स्पर्धा - उच्चांक |

| अ.क्र. | क्रीडा स्पर्धेचा स्तर |
|---|---|
| १ | ऑलिम्पिक जागतिक अजिंक्य स्पर्धा |
| २ | आशियाई/राष्ट्रकुले स्पर्धा |
| ३ | राष्ट्रीय अजिंक्यपद/फेडरेशन चषक/नॅशनल गेम्स/सर्वाधिक खेळ/वैयक्तिक खेळ |
| ४ | शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा/कनिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा |

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट (मंत्रालयासमोर), मुंबई-४०००२१.

दूरध्वनी : (०२२) २२०२८५९८, २२८५२०८१, फॅक्स : २२८५२०८२


---

**८. पुरस्कारासाठी निवड**

अ) निवड मंडळास एखाद्या वर्षी योग्य युवक अगर युवती पुरस्कार पात्र वाटले नाहीत, तर त्या वर्षाचा पुरस्कार देण्यात येणार नाही.

ब) एकदा पुरस्कार प्राप्त झालेल्या खेळाडूस पुन्हा पाच वर्षांपर्यंत या पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाही.

क) पुरस्काराबाबत निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच ऐनवेळी बदल करण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.

ड) पुरस्कारासाठी मागासलेल्या, दुर्गम, ठाामीण भागात राहत असलेल्या उत्कृष्ट क्रीडापटूने केलेले अर्ज प्राधान्याने विचारात घेतले जातील.

**९. पुरस्कारासाठी प्रस्ताव/शिफारस करण्यासंबंधीचे नियम**

अ) महाराष्ट्रातील विद्यापीठाचे कुलगुरु/विभागीय महसूल आयुक्त/जिल्हाधिकारी/महाविद्यालयाचे प्राचार्य/दैनिक वृत्तपत्राचे संपादक/यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय केंद्र, आजीव सदस्य, मान्यताप्राप्त सामाजिक संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करण्यात येईल.

ब) या पुरस्कारासाठी प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनाही शिफारस करता येईल.

क) अर्जासोबत व शिफारशीसोबत पाठविलेले लिखाण, दाखले, फोटो, अगर इतर साहित्य परत करणे शक्य होणार नाही. परंतु त्याबाबतीत निवड मंडळाने मागितल्यास कागदपत्रांच्या अस्सल मूळ प्रती सादर कराव्या लागतील. अशा मुळ प्रती पुरस्कार वितरणानंतर परत केल्या जातील. (पुरस्कार अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे साक्षांकित केलेली असावीत.)

ड) आपण दिलेल्या माहितीबाबत काही न्यायालयीन अथवा खाजगी वाद उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली असेल. त्याच्याशी प्रतिष्ठानचा कोणताही संबंध नसेल.

इ) पुरस्कारासंबंधी प्रस्ताव मागविणेबाबत दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्रातील वृत्तपत्रांमधून आवाहन केले जाईल.

फ) पुरस्कारासाठीचा प्रस्ताव मंगळवार, ०१ डिसेंबर २०२० पर्यंत मुंबईच्या कार्यालयात प्रत्यक्ष प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

ग) आपले निवासस्थान असलेल्या परिसरातील पोलीस स्टेशनचा आपल्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचा किंवा चौकशी सुरु नसल्याचा दाखला सोबत जोडणे अत्यावश्यक आहे.

**१०. प्रस्ताव/शिफारस करण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

- अर्ज सुवाच्च अक्षरात असावा. खाडाखोड नसावी.
- ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्याचे ठळक संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता, जन्म दिनांक, शैक्षणिक अर्हता, थोडक्यात बायोडाटा व पासपोर्ट साइजचे ३ रंगीत छायाचित्र प्रस्तावासोबत पाठवावेत.

  अ) रंगीत छायाचित्र सन २०२० मधील असावेत.

  ब) १ छायाचित्र अर्जाला चिकटवावे. कोणताही शिक्का छायाचित्रावर असू नये.
- ज्या युवक/युवतींची क्रीडा शिफारस केलेल आहे, त्या व्यक्तीने केलेल्या महत्त्वाच्या कार्याची संपूर्ण माहिती, त्या कार्याची ठळक वैशिष्ट्ये, त्याचे राज्याच्या दृष्टीने मूल्यमापन, त्या कार्यामुळे स्थानिक जनतेला झालेला लाभ, स्थानिक परिसरातील परिणाम वगैरे तपशिलासह पाठवावी.

# नवमहाराष्ट्र युवा अभियान


## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट (मंत्रालयासमोर), मुंबई-४०००२१.**

**दूरध्वनी : (०२२) २२०२८५९८, २२८५२०८१, फॅक्स : २२८५२०८२**


- वरील कार्यासाठी शिफारस केलेल्या व्यक्तीस केंद्र शासन, राज्य शासन, आंतरराष्ट्रीय संघटना, स्वयंसेवी संस्था अशा मार्गांगी मिळालेल्या वा मिळणाऱ्या आर्थिक व इतर साहाय्याची माहिती द्यावी. अधिक विस्ताराने लिहावयाचे असल्यास स्वंतत्र कागदावर रकाने तयार करुन आवश्यक ती माहिती जोडावी.
- शिफारस केलेल्या व्यक्तीला यापूर्वी पारितोषिके, बक्षिसे अगर मान्यता मिळाली असेल तर त्याचा संपूर्ण तपशील द्यावा.
- शिफारस करणाऱ्या क्रीडा व्यक्ती/संस्थेचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक द्यावा.
- अर्धवट भरलेले अथवा अपुऱ्या माहितीचे अर्ज पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.
- मुदतीपूर्वी विहित नमुन्यातील अर्ज भरुन सदरील अर्ज,

  **संघटक, नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जनराल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००२१.** या पत्त्यावर अथवा navmaharashtra@gmail.com या मेल आयडीवर पाठवावेत. पाकिटावर **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय क्रीडा पुरस्कार** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
- अधिक माहितीसाठी संपर्क - **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई (मनिषा खिल्लारे-022-22028508)**

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट (मंत्रालयासमोर), मुंबई-४०००२१.
दूरध्वनी : (०२२) २२०२८५९८, २२८५२०८१, फॅक्स : २२८५२०८२

# यशवंतराव चव्हाण राज्य युवा क्रीडा पुरस्कार : २०२०-२१

## अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

| अर्जाच्या नमुन्यातील शीर्षक | सूचना |
|---|---|
| पुरस्कार वर्ष | ज्या पुरस्कार वर्षासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत, ते वर्ष नमूद करावे. |
| खेळ व क्रीडा प्रकार | या रकान्यात खेळाडूने स्वत: खेळत असलेल्या व ज्या खेळामधील पुरस्कारासाठी अर्ज करावयाचा आहे, त्याचे नाव नमूद करावे. |
| खेळाडूचे संपूर्ण नाव | खेळाडूने आडनाव, स्वत:चे नाव पित्याचे/पतीचे नाव या क्रमाने नाव नमूद करावे. आडनावाची पध्दत नसल्यास नाव सर्वसाधारणपणे जसे लिहिण्यात येते, तसे लिहावे. (उदा. रवीकुमार, पी.टी. उषा इ.) इंग्रजीत नाव लिहिताना कॅपिटल स्क्रिप्टमध्ये लिहावे. |
| शैक्षणिक अर्हता | शैक्षणित अर्हता नमूद करताना मान्यताप्राप्त संस्थांच्या शैक्षणिक अर्हता नमूद कराव्यात. |
| पत्ता | निवासाचा तसेच व्यवसाय/कार्यालयाचा पत्ता पुरेशा तपशीलासह द्यावा. संक्षिप्त रुपे शक्यतो टाळावीत. दूरध्वनी क्रमांक एस.टी.डी. कोडसह द्यावा. त्याचप्रमाणे उपलब्ध असल्यास ई-मेल पत्ताही द्यावा. |
| नोकरी/व्यवसायाचे स्वरुप | नोकरी/व्यवसायाचे स्वरुप विषद करुन नोकरीत असल्यास हुद्दा व पदनाम नमूद करावे. संक्षिप्त रुपे शक्यतो टाळावीत. |
| खेळाडूची मागील पाच वर्षांची कामगिरी | मागील पाच वर्षांसाठीची कालगणना करताना लगतपूर्व पाच वर्ष धरण्यात यावी. (उदा. २०२० या वर्षाच्या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१९ हा कालावधी धरण्यात येईल.) |
| स्पर्धेचे व नाव ठिकाण | स्पर्धेचे नाव लिहिताना स्पर्धेचे संपूर्ण नाव व स्पर्धेचा क्रमांक (उदा. दहावी आशियाई स्पर्धा, ६० वी राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धा इ.) वर्ष व ठिकाण नमूद करावे. संघाने/खेळाडून प्राप्त केलेले स्थान पहिले, दुसरे, तिसरे अशा स्वरुपात नमूद करावे. |
| मार्गदर्शक | खेळाडूस एकापेक्षा अधिक मार्गदर्शक असल्यास त्यांचा मार्गदर्शनाचा कालावधी स्वतंत्रपणे नमूद करावा. |

# नवमहाराष्ट्र युवा अभियान


## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट (मंत्रालयासमोर), मुंबई-४०००२१.

दूरध्वनी : (०२२) २२०२८५९८, २२८५२०८१, फॅक्स : २२८५२०८२


## यशवंतराव चव्हाण राज्य युवा क्रीडा पुरस्कार : २०२०-२१

## अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

| अर्जाच्या नमुन्यातील शीर्षक | सूचना |
|---|---|
| उच्चांक | उच्चांकाबाबत माहिती देताना उच्चांकाचे परिमाण (वेळ, अंतर, वजन, संख्या, उंची इ.) स्पर्धेच्या नोंदणी करणाऱ्या अधिकृत पध्दतीनुसार द्यावेत (उदा. मीटर्स, मिनिटे, सेकंद, किलोग्रॅम इ.) आणि या उच्चांकाबाबत सदर स्पर्धेच्या आयोजकांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सादर कराव्यात. |
| अधिवास प्रमाणपत्र | अर्जासोबत खेळाडूचा जन्म महाराष्ट्रात झाला असेल. किंवा महाराष्ट्र राज्यात सलग १० वर्षे अधिवास असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याच्या अधिवास (Domicile) प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| इतर प्रमाणपत्रे | अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या प्रती राजपत्रित अधिकाऱ्यानेच साक्षांकित केलेल्या असणे आवश्यक आहे. तसेच कोणतीही मूळ प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडू नयेत. त्याचप्रमाणे मागणी केलेल्या प्रमाणपत्राखेरीज किंवा कागदपत्राखेरीज इतर अनावश्यक प्रमाणपत्रे, कात्रणे, फोटो इ. अर्जासोबत जोडू नये. सर्व प्रमाणपत्रे वर्षनिहाय व क्रमांकानुसार पृष्ठ क्रमांकासह सादर करावीत. अर्जासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांची सूची पृष्ठ क्रमांकासह सादर करावी. म्हणजे त्यांची पडताळणी करणे सुलभ होईल. |
| छायाचित्रे | अर्जासोबत पासपोर्ट आकाराची पाच रंगीत छायाचित्रे स्वतंत्र लिफाफ्यात द्यावीत. तसेच छायाचित्राच्या मागील बाजूस खेळाडूचे नाव व खेळ नमूद करावा. |
| सर्वसाधारण सूचना | अर्जातील तक्ते व रकाने माहिती भरण्यास पुरेसे होत नसल्यास जास्तीची माहिती भरण्यासाठी त्याच नमुन्यातील स्वतंत्र पृष्ठे अर्जातील मूळ पृष्ठानंतर लगेच जोडावीत. आवश्यक ती सर्व कागदपत्रे अर्जासोबतच सादर करताना जोडावीत. अंशतः कागदपत्रे जोडू नयेत. तसेच अपूर्ण भरलेली कागदपत्रेही जोडू नयेत. अर्ज सादर केल्यानंतर कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. त्याचप्रमाणे अपूर्ण कागदपत्रे असलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी. |
| अर्ज सादर करणे | खेळाडूंनी/संघटनांनी पुरस्कारासाठीचे अर्ज व संबंधित कागदपत्रे लिफाफ्यात घालून ते विहित मुदतीत वरील पत्त्यावर पाठवावेत. पोस्ट अथवा कुरिअरच्या विलंबाबाबत नवमहाराष्ट्र युवा अभियानाची जबाबदारी राहणार नाही. |